(**<u>इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयचा मराठी अनुवाद</u>**)

मुंबई येथील उच्च न्यायालयात
साधारण मूळ दिवाणी अधिकारिता

2021 ची रिट याचिका (एल) क्र. 7964

एडलवाईस अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड,
नोंदणीकृत कार्यालय पत्ता :- एडलवाइस हाऊस,
ऑफ सी. एस. टी. रोड, कलिना, मुंबई – 400098
ई. ए. आर. सी. ट्रस्ट एस. सी. 30 आणि
एस. सी. ट्रस्ट 256 चे विश्वस्त म्हणून कार्य करत आहे. ...याचिकाकर्ता

..विरुद्ध..

1. कर वसुली अधिकारी, आयकर विभाग,
कार्यालय पत्ता :- आयकर भवन,
न्यू मरीन लाइन्स, मुंबई - 400 020.

2. प्रसाद चेंबर्स,
नोंदणीकृत कार्यालय पत्ता :- ऑपेरा हाऊस,
मुंबई - 400004.

3. शासकीय परिसमापक, उच्च न्यायालय, मुंबई,
क्लासिक डायमंड्झ (इंडिया) लिमिटेड चे परिसमापक,
कार्यालय पत्ता :- बँक ऑफ इंडिया इमारत, 5 वा मजला,
महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई - 400001. ...उत्तरवादी

याचिकाकर्त्याकरिता मणिलाल खेर अंबालाल अँड कंपनी कडून निदेश घेऊन डॉ. बीरेंद्र सराफ, वरिष्ठ अधिवक्ता यांचेसह श्री. वैभव चारलवार, अधिवक्ता, श्री. सचिन चंद्राना, अधिवक्ता आणि श्री. व्ही. पुरोहित, अधिवक्ता.
उत्तरवादींकरिता श्री. शाम वाल्वे, अधिवक्ता.
सरकारी परिसमापक, मुंबई उच्च न्यायालय यांच्याकरिता श्री जहांगीर जेजीभोय, अधिवक्ता.

कोरम : न्यायमूर्ति सुनील पी. देशमुख आणि
न्यायमूर्ति अभय आहुजा.

न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक तारीख : 14 जुलै 2021

न्यायनिर्णय अधिघोषीत केल्याचा दिनांक : 28 जुलै 2021

(<u>व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे</u>)

न्यायनिर्णय :- (न्यायमूर्ति अभय आहुजा द्वारा)

1. याचिकाकर्ता ही कंपनी अधिनियम, 1956 अंतर्गत विधिसंस्थापित कंपनी आहे आणि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अक्ट, 2002 ("एस.ए.आर.एफ.ए.इ.एस.आय. अधिनियम /सिक्युरिटायझेशन अधिनियम") च्या कलम 3 नुसार सिक्युरिटायझेशन आणि ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी म्हणून नोंदणीकृत आहे.

2. याचिकाकर्ता, जप्ती आणलेल्या मालमत्तांवर उच्च प्रतिभूत आणि वेळेत पूर्व प्रभार असणे अभिप्रेत असलेल्या 'क्लासिक डायमंड्स (इंडिया) लिमिटेड' ('कर्जदार') (आता परिसमापनात आहे) यास पत सुविधांच्या अधिकाराचा, मालकीहक्काचा आणि हितांचा अभिहस्तांकिती म्हणून, कलमे 13 (2) आणि 13 (4) अंतर्गत नोटीस जारी करून एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय / सिक्युरिटायझेशन अधिनियमानुसार कार्यवाही प्रारंभ केल्यामुळे आणि जप्ती आणलेल्या मालमत्तपैकी (यात यापुढे वर्णन करण्यात येईल) एका मालमत्तेचा ताबा घेण्यात आल्यामुळे, कर्जदाराच्या आयकर देयाच्या वसुलीची मागणी करणारी, उत्तरवादी क्र. १ कर वसुली अधिकाऱ्याने पारित केलेल्या जप्ती आदेश, दि. 17 जानेवारी 2013, याने व्यथित झाला आहे.

3. याचिकाकर्त्याच्या वतीने थोडक्यात सादरीकरण असे आहे की, सुरुवातीला वर्ष 2003 मध्ये, इतर बँका आणि वित्तीय संस्थांमधून स्टेट बँक ऑफ इंडिया (एस. बी. आय.) या अभिहस्तांकनकर्त्याने कर्जदाराला 105 कोटी रुपयांच्या सुविधा मंजूर केल्या होत्या आणि त्या प्रतिभूत करण्यासाठी कर्जदाराने एस. बी. आय. च्या बाजूने सुविधा आणि प्रतिभूती कागदपत्रे निष्पादन केली होती. त्याचप्रमाणे 2011 साली इंडसइंड बँकेने कर्जदाराला 35 कोटी रुपयांच्या सुविधा मंजूर केल्या होत्या आणि त्या प्रतिभूत करण्यासाठी कर्जदाराने इंडसइंड बँकेच्या बाजूने सुविधा आणि प्रतिभूती कागदपत्रे निष्पादन केली होती.

4. दि. 17 जानेवारी 2013 रोजी उत्तरवादी क्रमांक 1 कर वसुली अधिकाऱ्याने, जप्ती आदेश, दिनांक 17 जानेवारी 2013, च्यानुसार कर्जदाराला कार्यालय क्रमांक 1004, प्रसाद चेंबर्स, ऑपेरा हाऊस, मुंबई - 400 004 ("उक्त वास्तू") हस्तांतरित करण्यापासून किंवा ताबा घेण्यापासून प्रतिबंधित आणि निर्बंध करणारी जप्ती लादली. असे सादर केले आहे की, केवळ डिसेंबर 2019 मध्ये, जेव्हा याचिकाकर्त्याच्या प्रतिनिधीने उक्त वास्तूला भेट दिली, तेव्हा याचिकाकर्त्याला उत्तरवादी क्रमांक 1 च्या जप्तीच्या आदेशाची माहिती मिळाली.

5. दरम्यान, अभिहस्तांकन विलेख, दि. 19 मार्च 2014, द्वारे याचिकाकर्त्याने कर्जदाराला एस. बी. आय. ने दिलेल्या सुविधांमध्ये सर्व अधिकार, हक्क आणि हितसंबंध मिळवले. दि. 29 मार्च 2017 रोजी याचिकाकर्त्याने कर्जदाराला इंडसइंड बँकेने दिलेल्या सुविधांचे समान अधिकार मिळवले. यापूर्वी स्टेट बँक ऑफ इंडिया/इंडसइंड बँकेच्या नावे तयार करण्यात आलेल्या उक्त वास्तूसह विविध स्थावर मालमत्तांच्या संदर्भात मालकीहक्क विलेख जमा करून निर्माण करण्यात आलेल्या समन्यायिक गहाणांच्या प्रतिभूतीच्या फायद्यांसह उपरोक्त अभिहस्तांकन होते.

6. तथापि, एस. बी. आय. आणि इंडसइंड बँकेला कर्जाची परतफेड करण्यात कर्जदाराने केलेली कसूर लक्षात घेता, अभिहस्तांकनकर्ते एस. बी. आय. आणि इंडसइंड बँकेने कर्ज वसुली न्यायाधिकरण-II, मुंबईसमोर स्वतंत्र कार्यवाह्या दाखल केल्या : (i) एस. बी. आय. ने दाखल केलेला 2013 चा मूळ अर्ज क्रमांक 205 आणि (ii) इंडसइंड बँकेने दाखल केलेला 2012 चा मूळ अर्ज क्रमांक 189. असे सादर केले आहे की दोन्ही मूळ अर्जांमध्ये, याचिकाकर्त्याला अनुक्रमे आदेश, दि. 17 नोव्हेंबर 2014 आणि 7 डिसेंबर 2017, च्यानुसार अभिहस्तांकिती असल्याने मूळ अर्जदार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

7. दि. 25 मे 2017 रोजी, याचिकाकर्त्याने एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाच्या कलम 13 (2) अंतर्गत एक नोटीस जारी केली, ज्यात कसूर नोंदविला गेला आणि कर्जदाराला उर्वरित थकबाकी रक्कम भरण्यास सांगितले. दि. 28 सप्टेंबर 2017 रोजी, या न्यायालयाने आय. सी. आय. सी. आय. बँक लिमिटेडने कर्जदाराच्या विरोधात दाखल केलेल्या 2012 च्या कंपनी याचिका क्रमांक 317 मध्ये कंपनी याचिकेला मंजूर करत कर्जदाराचे परिसमापक म्हणून शासकीय परिसमापक, उच्च न्यायालय मुंबई उच्च न्यायालयात, यांना नियुक्त केले. याचिकाकर्त्याने उक्त वास्तूचा ताबा घेतला आणि दि. 8 नोव्हेंबर 2017 रोजी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाच्या कलम 13 (4) आणि सिक्युरिटायझेशन नियमांच्या नियम 8 (1) अंतर्गत ताबा नोटीस जारी केली. दि. 9 नोव्हेंबर 2017 रोजी, याचिकाकर्त्याच्या अधिकृत अधिकाऱ्याने उत्तरवादी क्रमांक 3 ला उक्त वास्तूसह एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाच्या कलम 13 (4) अंतर्गत सर्व प्रतिभूत मत्तांच्या ताब्यात असल्याची माहिती दिली आणि ताबा नोटीस च्या संदर्भात आवश्यक जाहीर सूचना देखील प्रकाशित केल्या.

8. याचिकाकर्त्याच्या वतीने असेही सादर करण्यात आले आहे की, या न्यायालयाने 2019 च्या रिट याचिका क्रमांक 2580 मध्ये दिलेल्या आदेश, दि. 15 ऑक्टोबर 2019, च्यानुसार, उत्तरवादी-कर वसुली अधिकाऱ्याने पत्रव्यवहार, दि. 8 नोव्हेंबर 2019, च्या माध्यमातून याचिकाकर्त्याच्या बाजूने प्रतिभूत असलेल्या भारत डायमंड बोर्स, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400051 येथील कार्यालय क्रमांक बी. सी. 8013 आणि बी. सी. 8014 या इतर मालमत्तांच्या संदर्भात जप्ती उठवली होती. उक्त आदेश, दि. 15 ऑक्टोबर 2019, खालीलप्रमाणे आहेः

“भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 226 अंतर्गत ही याचिका, उत्तरवादी क्रमांक 1-कर वसुली अधिकाऱ्याने बी. सी.-8013 आणि बी. सी.-8014 क्रमांक असलेल्या, भारत डायमंड बोर्स, मुंबई येथील दोन कार्यालय वास्तूच्या संदर्भात पारित केलेल्या जप्तीच्या सूचना/आदेश, दि. 22 जानेवारी 2013, यांना रद्द करण्याची मागणी करते. याचिकाकर्त्याचा मूळ युक्तिवाद असा आहे की, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अक्ट, 2002 अंतर्गत एक प्रतिभूत धनको असल्याने याचिकाकर्त्याला राज्याच्या देयापेक्षा त्याच्या कर्जाच्या वसुलीला प्राधान्य आहे.

2. आम्ही नोंद घेतो की याचिकाकर्त्याने उत्तरवादी क्रमांक 1 ला विविध निवेदने दिली आहेत, शेवटचे दि. 30 ऑगस्ट 2019 या तारखेचे आहे ज्यात प्रतिभूतीवर त्याच्या प्राधान्यावर भर देण्यात आला आहे. वरील गोष्टी असूनही, उत्तरवादी क्रमांक 1 - कर वसुली अधिकाऱ्याने त्याला निकालात काढले नाही.

3. दि. 30 ऑगस्ट 2019 रोजीचे याचिकाकर्त्याचे निवेदन याचिकाकर्त्याला वैयक्तिक सुनावणी दिल्यानंतर आजपासून चार आठवड्यांच्या कालावधीत उत्तरवादी क्रमांक 1 द्वारे निकाली काढले जाईल, असे कर वसुली अधिकारी, उत्तरवादी क्रमांक 1 चे वकील श्री. मोहंती यांनी निर्देशावर सांगितले. वरील विधान आम्ही स्वीकारतो.

4. हे सांगण्याची गरज नाही की जर कर वसुली अधिकाऱ्याने त्याच्या निवेदनावर दिलेल्या आदेशामुळे याचिकाकर्ता व्यथित झाला असेल, तर याचिकाकर्त्याला कायद्यानुसार त्याला आव्हान देण्यास मोकळीक असेल.

5. त्यामुळे वरील अटींमध्ये याचिका निकाली काढल्या जाते. सर्व विवाद खुले ठेवले जातात.”

9. जेव्हा याचिकाकर्त्याच्या प्रतिनिधीने डिसेंबर 2019 मध्ये या वास्तूला भेट दिली, तेव्हा याचिकाकर्त्याला उत्तरवादी क्रमांक 1 ने पारित केलेल्या जप्ती आदेश, दि. 17 जानेवारी 2013, ची माहिती मिळाली, जी याचिकाकर्त्याला विकायचा आहे, जिच्या संदर्भात एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाच्या कलम 13 (4) आणि सिक्युरिटायझेशन नियमांच्या नियम 8 (1) अंतर्गत नोटीस चिकटवण्यात आली होती.

10. दि. 16 जानेवारी 2020 रोजी लिहिलेल्या पत्राद्वारे, याचिकाकर्त्याने उत्तरवादी क्रमांक 1 - कर वसुली अधिकाऱ्याला त्याच्या थकबाकी वसूल करण्यासाठी एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमान्वये याचिकाकर्त्याने केलेल्या कारवाईची माहिती दिली आणि 2019 च्या रिट याचिका क्रमांक 2580 मध्ये या न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या आणि याचिकाकर्त्याच्या बाजूने प्रतिभूत असलेल्या इतर मालमत्तांच्या संदर्भात जप्ती उठवण्याच्या कर वसुली अधिकाऱ्याने पारित केलेल्या त्यानंतरच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर या वास्तूच्या संदर्भात जप्ती उठवण्याची विनंती केली.

11. दि. 14 फेब्रुवारी 2020 रोजी, कर वसुली अधिकाऱ्याला याचिकाकर्त्याने उक्त वास्तूची जप्ती रिकामी करण्याची/उठविण्याची आठवण करून दिली. याचिकाकर्त्याच्या वकिलाद्वारे पत्र, दि. 1 मार्च 2021, द्वारे याचा पुनरुच्चार करण्यात आला.

12. असे सादर केले आहे की उत्तरवादी क्रमांक 1-कर वसुली अधिकाऱ्याने विनंतीला प्रतिसाद दिला नाही किंवा विनंती केल्याप्रमाणे याचिकाकर्त्याला ना हरकत प्रमाणपत्र ("एन. ओ. सी".) दिले नाही, त्यामुळे याचिकाकर्त्याने भारतीय संविधान, 1950 च्या अनुच्छेद 226 अंतर्गत ही रिट याचिका दाखल केली आहे आणि इतर गोष्टींबरोबरच उत्तरवादी क्रमांक 1 ला आदेश आणि निर्देश देण्याची मागणी केली आहे की उक्त वास्तूवर जप्ती आदेश, दि. 17 जानेवारी 2013, नुसार लावलेली उक्त जप्ती उठवावी आणि याचिकाकर्त्याला उक्त वास्तू विकण्याची परवानगी देणारे ना हरकत प्रमाणपत्र जारी करावे.

13. याचिकाकर्त्याच्या वतीने हजर असलेले विद्वान वरिष्ठ वकील डॉ. सराफ यांनी सादर केले की, उत्तरवादी क्रमांक 1 ने आकलन न करण्यात चूक केली आहे कि याचिकाकर्त्याने त्याच्या अनुक्रमे 16 जानेवारी 2020 आणि 14 फेब्रुवारी 2020 आणि 1 मार्च 2021 या तारखेच्या पत्रांद्वारे सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, याचिकाकर्ते हे वैध पूर्व प्रभार आणि त्याच्या बाजूने समन्यायिक गहाण असलेले एक प्रतिभूत धनको आहेत आणि त्यामुळे कर्जदाराच्या मालमत्तांवर त्यांचा पूर्व आणि उच्च प्रभार आहे. 2005 सालापासून याचिकाकर्त्याच्या बाजूने समन्यायिक गहाण ठेवण्याच्या परिणामी, याचिकाकर्त्याचा पूर्व आणि उच्च प्रभार आहे, ज्यामध्ये कोणत्याही प्रकारे व्यत्यय आणला जाऊ शकत नाही, असे त्यांनी सादर केले. सिक्युरिटायझेशन अधिनियमाच्या 26-ई च्या तरतुदी प्रतिभूत धनकोच्या देय रकमेला, म्हणजे उत्तरवादी क्रमांक 1 च्या देय रकमेपेक्षा याचिकाकर्त्याच्या देय रकमेला प्राधान्य देतात. ते आणखी सादर करतात की, आयकर विभागाच्या देय रकमेपेक्षा याचिकाकर्त्याच्या प्रभाराचे प्राधान्य प्रतिभूती हिताची अंमलबजावणी आणि ऋण वसुली कायदे आणि संकीर्ण उपबंध (दुरुस्ती) अधिनियम, 2016 द्वारे स्पष्ट केले गेले आहे, ज्याचे कलम 41, बँका आणि वित्तीय संस्थांना देय ऋणांची वसुली अधिनियम, 2002 ("आर. डी. डी. बी. अधिनियम") अंतर्गत कलम 31-बी सादर करते. सिक्युरिटायझेशन अधिनियमाचे कलम 26-ई हे आर. डी. डी. बी. अधिनियमाच्या कलम 31-बी च्या समतुल्य आहे.

14. विद्वान ज्येष्ठ वकील सादर करतात की, सिक्युरिटायझेशन अधिनियमाच्या कलम 26-ई च्या आधारे लागू करण्यात आलेल्या दुरुस्तीच्या दृष्टीने प्रतिभूत धनकोच्या दाव्याच्या प्राधान्याची सांविधिक मान्यता आहे, ज्यामध्ये प्रतिभूत धनकोंना इतर सर्व कर्जांवर आणि केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाला देय असलेले सर्व कर, उपकर आणि इतर स्थानिक करांवर प्राधान्य दिले जाते.

15. असे सादर केले आहे की, सिक्युरिटायझेशन अधिनियमाच्या तरतुदींनुसार, याचिकाकर्त्याला कर्जदाराच्या मत्ता विकण्याचा आणि उत्तरवादी क्रमांक 1 ने लावलेल्या कथित जप्तीच्या शिवाय त्याची देय रक्कम वसूल करण्याचा अधिकार आहे.

16. तो सादर करतो की उत्तरवादी क्रमांक 1 च्या निष्क्रियतेमुळे आणि त्याच्या वर्तनामुळे याचिकाकर्त्याला त्याच्या देय रकमेच्या वसुलीमध्ये गंभीर हानी निर्माण होत आहे आणि उत्तरवादी क्रमांक 1 चा आदेश/निष्क्रियता/अपयश प्रमादजन्य, चुकीचे, स्वेच्छानुसारी आणि अवास्तव आहे आणि या न्यायालयाद्वारे रद्द करण्यास पात्र आहे.

17. **बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज .विरुद्ध. व्ही. एस. कंदलगावकर (2015) 2 एस. सी. सी. 1** या प्रकरणातील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आणि **भारतीय स्टेट बँक .विरुद्ध. महाराष्ट्र राज्य (2020) एस. सी. सी. ऑनलाईन बॉम 4190** या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयाचा, त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ, विद्वान ज्येष्ठ वकील संदर्भ देतात आणि त्यावर अवलंबून आहे . तो सादर करतो की आयकर अधिनियमात आयकर देय रकमेच्या परमोच्चतेची तरतूद नाही; क्रॉऊन कर्जाला प्राधान्य नाही आणि विभागाकडे त्याच्या उत्तरात याचे कोणतेही उत्तर नाही. तो आणखी सादर करतो की या न्यायालयाने *भारतीय स्टेट बँक* (उपरोल्लेखित) या प्रकरणात देखील असे म्हटले आहे की प्रतिभूत ऋणाला कर थकबाकीपेक्षा प्राधान्य आहे आणि हा निर्णय आयकर थकबाकीच्या संदर्भात याचिकाकर्त्याच्या प्रकरणाला पूर्णपणे लागू होतो. त्यामुळे, प्रतिभूत धनको म्हणून याचिकाकर्त्याकडे आयकर थकबाकीपेक्षा पूर्व उच्च प्रभार आहे, असे तो सादर करतो.

18. विद्वान ज्येष्ठ वकील आणखी सादर करतात की, यापूर्वी याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या 2019 च्या रिट याचिका क्रमांक 2580 मध्ये, या न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या इतर दोन मालमत्तांच्या संदर्भात आदेश, दि. 15 ऑक्टोबर 2019, पारित केला होता, ज्या कर वसुली अधिकाऱ्याने जप्त केल्या होत्या, ज्या आदेशानुसार, कर वसुली अधिकाऱ्याने त्या मालमत्तांवरील जप्ती उठवली.

19. विद्वान ज्येष्ठ वकील सादर करतात की वरील बाबी लक्षात घेता, उक्त वास्तूच्या संदर्भातही अशीच वागणूक दिली गेली पाहिजे होती, जी उत्तरवादी क्रमांक 1 देण्यात अयशस्वी ठरला आहे, ज्यामुळे जप्ती थेट उचलणे/उठविणे यासाठी या न्यायालयाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता आहे.

20. दुसरीकडे, उत्तरवादी-महसूल विभाग यांनी उत्तराचे प्रतिज्ञापत्र, दि. 9 जुलै 2021, दाखल केले आहे. असे सादर केले आहे की कर्जदाराच्या विरुद्ध एकूण आयकर मागणी रु. 58,64,54,659/- अधिक व्याज विविध निर्धारण वर्षांसाठी 2006-2007 पासून ते 2013-2014 पर्यंत असल्याने, थकबाकी मागणीची वसुली करण्याचे इतर कोणत्याही साधनांच्या अभावामुळे, कर्जदार-करपात्र

व्यक्तीची स्थावर मालमत्ता आयकर अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीच्या तरतुदींनुसार टी. आर. ओ. ने जप्त केली होती.

21. आणखी असे सादर केले आहे की, आयकर अधिनियमाच्या कलम 133 ए अंतर्गत वसुलीचे सर्वेक्षण, निर्धारण अधिकारी, डी. सी. आय. टी.-5 (1), मुंबई यांनी दि. 11 डिसेंबर 2012 रोजी निर्धारण वर्ष 2011-12 याशी संबंधित रु. 4,47,98,536/- च्या थकबाकी मागणीची वसुली करण्याच्या उद्देशाने उक्त वास्तूत केले होते, ज्या सर्वेक्षणादरम्यान, करपात्र व्यक्ती कर्जदाराला कर्ज आणि आगाऊ रकमेच्या तपशिलासह विविध तपशील सादर करण्यासाठी बोलावले गेले होते, तथापि, कर्जदाराने याचिकाकर्त्याकडे विषय मालमत्तेला गहाण ठेवण्याबद्दल कुठेही उल्लेख केला नव्हता. त्यामुळे महसुलाच्या हितासाठी सदर वास्तू जप्त करण्यात आल्याचे ते सादर करतात.

22. महसुलाचे उपस्थित विद्वान वकील श्री शाम वाल्वे यांनी प्रतिज्ञापत्रात केलेल्या सादरीकरणाचा पुनरुच्चार केला आहे. **सेंट्रल बँक ऑफ इंडिया .विरुद्ध. केरळ राज्य (2009) 4 एस. सी. सी. 94** या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ देत त्यांनी सादर केले कि, त्या प्रकरणात केरळ अधिनियमाच्या कलम 26 बी अंतर्गत राज्याच्या बाजूने तयार करण्यात आलेल्या सांविधिक प्रथम प्रभाराला बँकेच्या थकबाकी वसूल करण्याच्या अधिकारावर प्राधान्य असल्याचे मानले गेले.

23. तो असेही सादर करतो की करपात्र व्यक्ती 2012 पासून डिफॉल्टमध्ये आहे आणि डिफॉल्टरच्या बँक खात्याची जप्ती कर थकबाकी वसूल करण्यात मदत करू शकली नाही, त्यामुळे स्थावर मालमत्ता महसूल विभागाच्या हितासाठी जप्त करण्यात आली आहे. प्रतिज्ञापत्राचा संदर्भ देत ते पुढे सादर करतात की विभागाने पत्र, दि. 20 डिसेंबर 2017, नुसार शासकीय परिसमापकसमोर रु. 58,64,54,659/- च्या मागणीच्या वसुलीसाठी त्याचा दावा दाखल केला आहे.

24. शेवटी, उत्तरवादींचे विद्वान वकील श्री. वाल्वे यांनी सादर केले की जरी आयकर अधिनियमाच्या कलम 220 ते 232 आणि त्याच्या दुसऱ्या अनुसूचीनुसार महसुल विभागाच्या हितासाठी कर्जदाराची स्थावर मालमत्ता टी. आर. ओ. ने जप्त केली असली तरी, मागणी हिशेब पक्का करेपर्यंत/वसुली होईपर्यंत जप्ती रद्द करण्याची /उचलण्याची तरतूद या अधिनियमात नाही. त्यामुळे, अशा तरतुदीच्या अनुपस्थितीत, योग्य आदेश पारित करणे हे या न्यायालयाकरीता असेल, असे ते न्याय्यपणे सादर करतात.

25. आम्ही याचिकाकर्त्याचे विद्वान वरिष्ठ वकील डॉ. बीरेंद्र सराफ तसेच उत्तरवादी - महसूल विभागाकरिता उपस्थित विद्वान वकील श्री शाम वाल्वे तसेच शासकीय परिसमापकचे विद्वान वकील श्री जेजीभोय यांचे म्हणणे ऐकले आहे. त्यांच्या सक्षम मदतीने आम्ही या प्रकरणातील कागदपत्रांचे आणि कार्यवाहीचे अवलोकन केले आहे.

26. वस्तुस्थिती वादात नाही. याचिकाकर्ता हे कर्जदार कंपनीचे (आता परिसमापनात) एक प्रतिभूत धनको आहेत, ज्यानी उक्त वास्तूमिळून मालमत्तांवर प्रतिभूतीसह यापूर्वी कर्जदाराला बँकांनी दिलेल्या सुविधांचे अधिकार, मालकी हक्क आणि हितसंबंध अधिग्रहित केले आहे आणि याचिकाकर्ता संबंधित बँकांनी आर. डी. बी. अधिनियमान्वये कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई समोर दाखल केलेल्या मूळ अर्जांमध्ये प्रतिस्थापित करण्यात आला. याचिकाकर्त्याने एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाच्या कलम 13 (2) अंतर्गत नोटीस जारी केल्यानंतर या वास्तूचा ताबा घेतला आहे आणि एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाच्या कलम 13 (4) आणि सिक्युरिटायझेशन नियमांच्या नियम 8 (1) अंतर्गत ताबा नोटीस देखील जारी केली आहे. याचिकाकर्त्याने उत्तरवादी क्रमांक 3 ला देखील माहिती दिली होती आणि उक्त ताब्याबद्दल आवश्यक जाहीर सूचना देखील प्रकाशित केल्या होत्या. याचिकाकर्त्याने उत्तरवादी - टी. आर. ओ. ला उक्त वास्तुवरील जप्ती उठवण्यासाठी/उचलण्यासाठी वारंवार केलेल्या विनंतीकडे लक्ष दिले गेले नाही. आर. डी. बी. अधिनियमाच्या कलम 31-बी मधील तरतुदी तसेच सिक्युरिटायझेशन अधिनियमाच्या कलम 26-ई मधील तरतुदी याचिकाकर्त्याच्या प्रकरणाला लागू असल्याने, महसूल विभाग असे म्हणत आहे की टी. आर. ओ. ला याचिकाकर्त्याच्या बाजूने असलेल्या प्रभाराची माहिती नव्हती आणि आयकर अधिनियमात अशी कोणतीही तरतूद नाही जी टी. आर. ओ. ला एकदा लावलेली जप्ती उचलण्याचे/उठवण्याचे अधिकार देते.

27. याचिकाकर्ता आता उक्त वास्तू विकण्याचा प्रयत्न करत आहेत, तथापि, जप्तीचा आदेश, 17 जानेवारी 2013 आणि एन. ओ. सी. मंजूर करण्यात पहिल्या उत्तरवादीचे अपयश लक्षात घेता याचिकाकर्ता आमच्या समोर आहे.

28. याचिकाकर्त्याच्या बाजूने अभिहस्तांकित प्रतिभूत कर्जाला सरकारी थकबाकी/कर थकबाकीपेक्षा प्राधान्य आहे की नाही, हा येथे उद्भवणारा मुद्दा आता अनिर्णित विषय राहिलेला नाही.

29. *बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज .विरुद्ध. व्ही. एस. कांडलगावकर* (*उपरोल्लेखित*) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने, स्टॉक एक्स्चेंजच्या नियम 43 अंतर्गत वापरण्यात आलेला धारणाधिकार हा आयकर थकबाकीपेक्षा उच्च अधिकार असल्याचे म्हटले जाऊ शकते का, जो स्टॉक एक्स्चेंज एक प्रतिभूत धनको असल्यामुळे देय ठरू शकतो, या प्रश्नावर विचार करताना असे म्हटले आहे की आयकर अधिनियमात आयकराद्वारे थकबाकीच्या कोणत्याही सर्वोच्चतेची तरतूद नाही. सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारे निर्णय देताना, **देना बँक .विरुद्ध. भिखाभाई प्रभुदास पारेख अँड कंपनी (2000) 5 एस. सी. सी. 694** या प्रकरणातील स्वतःच्या निर्णयाचा संदर्भ दिला, ज्यामध्ये असे म्हटले गेले होते की सरकारी थकबाकीला

केवळ अप्रतिभूत कर्जांवर प्राधान्य आहे. उक्त निर्णयाचे परिच्छेद 39 आणि 40 आदरपूर्वक खाली उद्धृत केले आहेतः

"39. लक्षात घेण्यासारखी पहिली गोष्ट म्हणजे आयकर अधिनियमात आयकराद्वारे थकबाकीच्या कोणत्याही सर्वोच्चतेची तरतूद नाही. म्हणूनच देना बँकेच्या प्रकरणातील न्यायालयाने असे म्हटले की, सरकारी थकबाकीला केवळ अप्रतिभूत कर्जावर प्राधान्य असते आणि अशा प्रकारे निर्णय देतांना न्यायालयाने गिल्स .वि. ग्रोवरमधील एका न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला ज्यामध्ये असे म्हटले गेले आहे की, वस्तूंच्या ताबेगहाण घेणाऱ्यांवर क्रॉऊनला प्राधान्य नाही. सध्याच्या प्रकरणात, क्राउन कर्जे याच्या नात्याने इंग्लंडचा सामान्य कायदा, संविधानाच्या अनुच्छेद 372 च्या आधारे लागू झाला, ज्यामध्ये असे म्हटले आहे की संविधानाच्या प्रारंभाच्या अगदी आधी भारताच्या प्रदेशात लागू असलेले सर्व कायदे सक्षम विधिमंडळ किंवा इतर सक्षम प्राधिकरणाद्वारे बदलले किंवा रद्द केले जाईपर्यंत लागू राहतील. खरे तर, जिल्हाधिकारी .वि. सेंट्रल बँक ऑफ इंडिया या प्रकरणात विविध न्यायनिर्णयांचा संदर्भ दिल्यानंतर असे मत व्यक्त केले की आयकर थकबाकीच्या थकबाकीला प्राधान्य देण्याचा सरकारचा दावा हा इंग्लिश सामान्य कायद्याच्या क्राऊन कर्जाच्या प्राधान्याच्या सिद्धांतातून उद्भवला आहे आणि त्याला 1950 पूर्वीच्या ब्रिटिश भारतात न्यायिक मान्यता देण्यात आली होती आणि म्हणूनच संविधानापूर्वी भारताच्या प्रदेशात तो "लागू असलेला कायदा" होता आणि संविधानाच्या अनुच्छेद 372 द्वारे कायम ठेवण्यात आला होता. (ए. आय. आर. पी.पी. 1835-36, परिच्छेद 7 : एस. सी. आर. पी.पी. 861-62).

40. सध्याच्या प्रकरणात, वर नमूद केल्याप्रमाणे, स्टॉक एक्स्चेंजचा धारणाधिकार त्याला एक प्रतिभूत धनको बनवते. तसे प्रकरण असल्यास, हे स्पष्ट आहे की नियम 43 अंतर्गत धारणाधिकार हा सांविधिक धारणाधिकार आहे की करारातून उद्भवणारा धारणाधिकार आहे, यामुळे फारसा फरक पडत नाही, कारण एक प्रतिभूत धनको असल्याने, स्टॉक एक्सचेंजला सरकारी थकबाकीपेक्षा प्राधान्य असेल."

30. *भारतीय स्टेट बँक .विरुद्ध. महाराष्ट्र राज्य आणि इतर* (उपरोल्लेखित) या प्रकरणात या न्यायालयाला, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियम तसेच आर. डी. डी. बी. अधिनियमाच्या तरतुदींचा विचार केल्यानंतर, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 अंतर्गत कर/मूल्यवर्धित कराची थकबाकी आणि एखाद्या प्रतिभूत धनकोचा प्रभार यांच्यातील प्राधान्याच्या प्रश्नावर विचार करण्याची संधी होती, ज्यामध्ये असे निरीक्षण नोंदविले आहे की प्रतिभूत धनकोच्या गहाणला कर/मूल्यवर्धित कराच्या थकबाकीसाठीच्या राज्याच्या प्रभारापेक्षा पेक्षा पूर्व प्रभार मिळते. उक्त निर्णयाचे खालील परिच्छेद देखील उपयुक्तपणे खाली उद्धृत केले आहेतः

"30. आर. डी. बी. अधिनियमाच्या कलम 31-बी आणि एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाच्या कलम 25-ई. च्या साध्या आणि संयुक्त वाचनावरून हे स्पष्ट होते की त्यात समाविष्ट असलेल्या अबाधित भाषेच्या आधारे, ज्या मत्तांवर प्रतिभूती हित तयार केले जाते त्या मत्तांच्या विक्रीद्वारे प्रतिभूत ऋणे वसूल करण्याच्या प्रतिभूत धनकोंच्या अधिकारांना केंद्र/राज्य

सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाला देय असलेल्या महसूल, कर, उपकर आणि स्थानिक करांसह सरकारी थकबाकीपेक्षा प्राधान्य असेल. प्रभार / प्रतिभूती हित निर्माण करण्याच्या तारखांच्या तसेच दावा दाखल करण्याच्या तारखांच्या आणि उक्त मालमत्तेवर पहिल्या प्रभाराचा दावा करण्यासाठी वसुलीची कार्यवाही प्रारंभाच्या तारखांच्या वादकथानातील संदर्भाची देखील आम्ही नोंद घेतो. याचिकाकर्त्याचे गहाण दि. 13 जानेवारी 2014 रोजी उक्त मालमत्तेवर तयार करण्यात आले होते आणि प्रतिभूत धनको म्हणून त्यांनी विक्रीकर विभागाच्या प्रभारापेक्षा प्रभाराच्या प्राधान्याचा दावा केला आहे. आम्हाला असे आढळले आहे की उत्तरवादी क्रमांक 2 ने, इतर गोष्टींबरोबरच, एम. व्ही. ए. टी. अधिनियमाच्या कलम 32, 33 आणि 34 अंतर्गत वसुलीची कार्यवाही दि. 10 मार्च 2016 रोजी सुरू केली होती, तर एम. व्ही. ए. टी. अधिनियमाच्या कलम 32 अंतर्गत जप्ती याचिकाकर्त्याला लिहिलेल्या पत्र, दि. 28 मार्च 2018, द्वारे करण्यात आली होती, असे सांगून, उक्त मालमत्तेवर पाहिल्या प्रभाराचा दावा केला होता. याचिकाकर्त्याने आर. डी. बी. अधिनियमाच्या तरतुदींनुसार कार्यवाही सुरू केली होती. उत्तरवादी क्रमांक 2 च्या नोटीस, दि. 28 मार्च 2018, च्या पूर्वी, एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाच्या <u>कलम 13 (2)</u> अंतर्गत नोटीस, दि. 27 नोव्हेंबर 2017, च्या द्वारे उपरोक्त मालमत्तेतील प्रतिभूती हिताची अंमलबजावणी करण्यासाठी देखील वर नमूद केल्याप्रमाणे पावले उचलण्यात आली आहेत.

34. आमच्या साधकबाधक दृष्टिकोनातून हातात असलेल्या प्रकरणातील तथ्ये ए. एस. आर. ई. सी. (इंडिया) लिमिटेड (उपरोल्लेखित) च्या प्रकरणातील तथ्यांसारखीच आहेत की हा निर्णय या प्रकरणातील तथ्यांना पूर्णपणे लागू होईल की जर कोणत्याही केंद्रीय संविधीने प्रतिभूत धनकोच्या बाजूने प्रभाराला प्राधान्य दिले तर ते राज्याच्या मूल्यवर्धीत करांतर्गत देय असलेल्या करासाठी राज्याच्या बाजूने असलेल्या प्रभारापेक्षा वर असेल. म्हणून, आमच्या मते या प्रकरणातील तथ्यांमध्ये जे महत्वपूर्ण ठरते ते म्हणजे कर थकबाकीपेक्षा प्रतिभूत कर्जाच्या उक्त मत्तांवर प्रभारास प्राधान्य देणे हा मुद्दा आहे आणि प्रभार पहिला किंवा वेळेत नाही हे नाही.

35. प्रकरणाच्या या दृष्टिकोनातून, जरी आम्हाला एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाच्या <u>कलम 26-ई</u> च्या परिणामकारकतेच्या तारखेशी संबंधित उत्तरवादींच्या युक्तिवादाला हाताळणे आवश्यक नसले, तरी आमचे असे मत आहे की जरी <u>कलम 26-ई</u> केवळ दि. 24 जानेवारी 2020 पासून भविष्यलक्ष्मी लागू झाले आणि हाती असलेल्या तथ्यांना लागू झाले नाही, तरी काही फरक पडणार नाही; आमच्या मते आर. डी. बी. अधिनियमाचे कलम 31-बी कर थकबाकीचा दावा करण्यासाठी प्रतिवादीच्या प्रभारापेक्षा प्रतिभूत धनकोला प्राधान्य देण्यासाठी पुरेसे असेल.

36. मद्रास उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाचे, मुख्य न्यायमूर्ती संजय किशन कौल (जे त्यावेळी हिज लॉर्डशिप होते) यांनी लिहिलेल्या <u>सहाय्यक आयुक्त (सी. टी.) .विरुद्ध. इंडियन ओव्हरसीज बँक</u> या प्रकरणातील, ए.एस.आर.ई.सी. (इंडिया) लिमिटेड (उपरोल्लेखित) प्रकरणात आमचे न्यायालय अवलंबून असलेले, खालील निरीक्षणे महत्वपूर्ण आहेत आणि ती खालीलप्रमाणे उद्धृत केली आहेत.

"2006 च्या डब्ल्यू. पी. क्रमांक 6267 आणि 2011 च्या डब्ल्यू. पी. क्रमांक 253 मधील निर्देश आदेशाच्या अनुषंगाने रिट याचिका खालील मुद्द्यांच्या संदर्भात पूर्ण खंडपीठासमोर सूचीबद्ध केल्या गेल्या आहेतः-"

> ***" ए) वित्तीय संस्था हिला, जी एक प्रतिभूत धनको आहे, किंवा संबंधित सरकारी विभागाला, कर आणि इतर थकबाकीच्या संदर्भात, विवादातील गहाण ठेवलेल्या मालमत्तेवर 'प्रभाराचे प्राधान्य' असेल का.***
>
> *बी) विवादातील गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या त्रयस्थ असामी खरेदीदाराच्या स्थितीबद्दल आणि अधिकारांबद्दल"*

2. ***आमचे असे मत आहे की जर काही शंका असेल तर ती प्रतिभूती हिताची अंमलबजावणी आणि ऋण वसुली कायदे आणि संकीर्ण उपबंध (दुरुस्ती) अधिनियम, 2016 च्या दृष्टीने सोडवली जाते, ज्याचे कलम 41, मुख्य अधिनियमात कलम 31 बी प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करते, जे खालीलप्रमाणे आहेः***

> ***" 31 बी. सध्या लागू असलेला असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या मत्तांवर प्रतिभूती हित तयार केले जाते, त्या मत्तांच्या विक्रीद्वारे त्यांना देय असलेले आणि देय प्रतिभूत ऋणे वसूल करण्याच्या प्रतिभूत धनकोच्या अधिकारांना प्राधान्य असेल आणि ते केंद्र सरकार, राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाला देय असलेले महसूल, कर, उपकर आणि स्थानिक करांसह इतर सर्व ऋणे आणि सरकारी थकबाकीपेक्षा प्राधान्याने दिले जातील.***
>
> *स्पष्टीकरण.- या कलमाच्या प्रयोजनार्थ याद्वारे हे स्पष्ट केले जाते की नादारी आणि दिवाळखोरी संहिता, 2016 च्या प्रारंभी किंवा नंतर, कर्जदाराच्या प्रतिभूती मत्तांच्या संदर्भात नादारी किंवा दिवाळखोरीची कार्यवाही प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये, कर्ज फेडण्यात प्रतिभूत धनकोंना प्राधान्य त्या संहितेच्या तरतुदींच्या अधीन असेल."*

3. अशा प्रकारे, यात काही शंका नाही की, ज्या मत्तांवर प्रतिभूत हित तयार केले जाते, त्या मत्तांच्या विक्रीद्वारे देय प्रतिभूत ऋणे वसूल करण्याच्या प्रतिभूत धनकोच्या अधिकारांना, सरकारी देय म्हणजेच केंद्र सरकार, राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाला देय असलेले महसूल, कर, उपकर आणि स्थानिक करांपेक्षा आणि सर्व ऋणांपेक्षा पेक्षा प्राधान्य असेल . केंद्रीय कायद्यात सादर करण्यात आलेले हे कलम 'असे असले तरीही' या वाक्यखंडासह आहे आणि दि. 01.09.2016 पासून लागू झाले आहे.

4. कायदा आता अंमलात आला आहे, नैसर्गिकरित्या तो प्रलंबित वाद तत्वाच्या संदर्भात पक्षांच्या हक्कांचे नियमन करेल.

5. अशा प्रकारे, वर नमूद केलेल्या बाबी प्रश्न (ए) याचे उत्तर वित्तीय संस्थेच्या बाजूने देईल, जी गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा लाभ घेणारी एक प्रतिभूत धनको आहे.

*6.	जोपर्यंत प्रश्न (बी) चा संबंध आहे, तोपर्यंत तो केवळ लिलावाच्या विक्रीशी संबंधित असल्याचे म्हटले जाते, जे मालमत्तेचे गहाण ठेवणाऱ्या प्रतिभूत धनकोने वापरलेल्या अधिकारांच्या अनुषंगाने केले जाऊ शकते. हा पैलू कलम 31 बी च्या प्रस्तावनाद्वारे देखील समाविष्ट केला गेला आहे, कारण त्यात "ज्या मत्तांवर प्रतिभूत हित तयार केले जाते त्या मत्तांच्या विक्रीद्वारे त्यांना देय प्रतिभूत ऋणे" समाविष्ट आहेत.*

*7.	अशा प्रकारे, आम्ही उपरोक्त निर्देशाला तदनुसार उत्तर देतो.*

*8.	प्रत्येक प्रकरणे हाताळण्यासाठी प्रकरणे रोस्टर खंडपीठासमोर ठेवली जावीत.*

*39.	वरील बाबी लक्षात घेऊन आणि वर नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये व्यक्त केलेल्या मतांशी आदरपूर्वक सहमत असल्याने, आम्ही असे मानतो की प्रतिभूत धनकोचे म्हणजेच याचिकाकर्ता बँकेचे गहाण कर/मूल्यवर्धीत कराच्या देयासाठी उत्तरवादींच्या प्रभारापेक्षा पूर्व प्रभार मिळवेल.”*

31.	आमच्या मते वरील निर्णय येथील याचिकाकर्त्याच्या प्रकरणाला सरंक्षित करते. आयकर अधिनियमान्वये सरकारी देयापेक्षा प्रतिभूती धनकोच्या प्रभाराला प्राधान्य असेल असे म्हणण्याशिवाय या प्रकरणात दुसरा कोणताही दृष्टिकोन बाळगण्याचे आम्हाला कोणतेही कारण नाही. आयकर अधिनियमात अशी कोणतीही तरतूद नाही ज्यात प्रतिभूत ऋणापेक्षा आयकर विभागाच्या देयाची कोणतीही सर्वोच्चता आहे.

32.	*सेंट्रल बँक ऑफ इंडिया .विरुद्ध. केरळ राज्य* (*उपरोल्लेखित*) या महसुल विभागाचे वकील अवलंबून असलेल्या निर्णयाच्या संदर्भात, आम्ही नमूद करतो की या निर्णयाचे *भारतीय स्टेट बँक .विरुद्ध. महाराष्ट्र राज्य* (*उपरोल्लेखित*) या प्रकरणातील वरील निर्णयात देखील वेगळेपण दर्शविले गेले होते, ज्यामध्ये असे निरीक्षण नोंदवले गेले होते की माननीय सर्वोच्च न्यायालयाने आर. डी. बी. अधिनियमचे कलम 34 (1) आणि एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाचे कलम 35 च्या तरतुदी समोर ठेवून मुंबई विक्री कर अधिनियम, 1959 चे कलम 38-सी आणि केरळ सामान्य विक्री कर अधिनियम, 1963 चे कलम 26-बी च्या तरतुदींचा विचार केला होता, तर कलम 31-बी तेव्हा संविधीच्या पुस्तकात नव्हता आणि त्यामुळे उक्त प्रकरणात तो विचारात घेण्यात आला नाही; शिवाय, *सेंट्रल बँक ऑफ इंडिया .विरुद्ध .केरळ राज्य* (*उपरोल्लेखित*) या प्रकरणातील निर्णय आर. डी. बी. अधिनियमात 31-बी आणि एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमात कलम 26 ई समाविष्ट करण्याच्या दुरुस्तीपूर्वी घेण्यात आला होता. भारतीय स्टेट बँक .विरुद्ध. महाराष्ट्र राज्य आणि इतर (उपरोल्लेखित) या प्रकरणातील निर्णयाचा परिच्छेद 41 उपयुक्तपणे खाली उद्धृत केला आहेः-

*"41.	अभिलेखापासून दूर होण्यापूर्वी आम्ही हे सांगू इच्छितो की सेंट्रल बँक ऑफ इंडिया .विरुद्ध. केरळ राज्य (2009) 4 एस. सी. सी. 94 या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची आम्हाला जाणीव आहे, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे मत मांडले आहे की जर*

राज्य अधिनियमाने मालमत्तेवर प्रथम प्रभार तयार केले तर प्रतिभूत धनकोला सांविधिक तरतुदीविरुद्ध दावा करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालय बँका आणि वित्तीय संस्थाना देय ऋणांची वसुली अधिनियम, 1993 (आता आर. डी. बी. अधिनियम) चे कलम 34 (1) आणि एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमाचे कलम 35 च्या तरतुदी समोर ठेवून मुंबई विक्री कर अधिनियम, 1959 चे कलम 38-सी आणि केरळ सामान्य विक्री कर अधिनियम, 1963 चे कलम 26-बी च्या तरतुदींवर विचार करत होते. तथापि, प्रथमतः, कलम 31-बी तेव्हा संविधीच्या पुस्तकात नसल्यामुळे, प्रकरणाचा निर्णय घेताना या कलमाचा प्रभाव विचारात घेण्यात आला नाही. या संदर्भात, हे देखील लक्षात घेतले पाहिजे की सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या (उपरोल्लेखित) प्रकरणातील न्यायनिर्णय हा आर. डी. बी. अधिनियमातील तसेच एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमातील दुरुस्तीपूर्वीचा होता ज्याद्वारे आर. डी. बी. अधिनियमातील कलम 31-बी आणि एस. ए. आर. एफ. ए. ई. एस. आय. अधिनियमातील कलम 26-ई समाविष्ट करण्यात आले होते."

33. त्यामुळे आमचे असे मत आहे की उक्त वास्तूवर याचिकाकर्त्याचा प्रभार/गहाण याला आयकर विभागाच्या देयापेक्षा प्राधान्य आहे आणि उत्तरवादी क्रमांक 1 द्वारे उक्त जप्ती, 17 जानेवारी 2013, प्रतिभूत धनको म्हणून याचिकाकर्त्याच्या अधिकारांच्या मार्गात येऊ शकत नाही.

34. उपरोक्त चर्चा लक्षात घेता, आम्ही उत्तरवादी क्रमांक 1 ला, या आदेशाच्या तारखेपासून दोन आठवड्यांच्या कालावधीत, (i) उक्त वास्तुवरील म्हणजेच कार्यालय वास्तू क्रमांक 1004, 10 वा मजला, प्रसाद चेंबर्स, ऑपेरा हाऊस, मुंबई - 400 004, जप्ती आदेश, दि. 17 जानेवारी 2013 च्या अनुसार लादलेली उक्त जप्ती उठवावी आणि (ii) याचिकाकर्त्याला उक्त वास्तू विकण्याची परवानगी देणारे ना हरकत प्रमाणपत्र मंजूर करून जारी करावे असे निर्देश देतो.

35. वरील अटींमध्ये याचिकेला मंजूर करण्यात आले आहे. मात्र, खर्चाबाबत कोणताही आदेश नसेल.

(न्यायमूर्ति अभय आहुजा) **(न्यायमूर्ति सुनील पी. देशमुख)**

निकिता गाडगीळ

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर

करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबाजवणीकरीता वैध मानला जाईल."